INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# दलित कवयित्रींच्या कवितेतील 'सखी' प्रतिमाविश्व

## ('Sakhi' Image World in the Poetry of Dalit Poets)

**युवराज डोईफोडे**
संशोधक

**प्रो. डॉ. शंकर वाघमारे**
मार्गदर्शक
पी. पी. कॉलेज, नेकनूर, जि. बीड

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/06.2022-41882323/IRJHIS2206005

**प्रस्तावना:**

दलित कवितेतील प्रतिमाविश्व अनेक अंगाने समृद्ध आहे. या कवितेतून विद्रोह आणि आक्रमकतेला पुरक ठरणा-या प्रतिमांची योजना केलेली आहे. दलित कवयित्रींनी प्रतिमांच्या बाबतीत जाणिवपूर्वक नव्यावाटा चोखाळल्या आहेत. आतापर्यंत वापरून झालेल्या प्रतिमांना त्यांनी नाकारले आहेत. "भाषिक रूपांना नवीन अर्थछटा प्राप्त करून देण्यासाठी रूढ झालेली प्रमाणके मोडणे आवश्यक असते"[1] प्रतिमांच्या नवनवीन छटेतून त्यांनी मोठे विश्व निर्माण केले आहे. चिंतनगर्भता, प्रतीकात्मकता, अर्थांची व्यामिश्रता, अनेकार्थता, मिथ्चा समर्पक वापर, पारंपारिक प्रतिमांना नवे अर्थ प्रधान करने, प्रतिमांची मोडतोड करून त्या नव्या अर्थासह सादर करने अशा अनेक गुण वैशिष्ट्यासह दलित कवयित्रींनी प्रतिमांचा वापर केलेला आहे. दलित कवितेमध्ये आंबेडकरी, माय, सूर्य, मिथ्, सखी आणि इतर प्रतिमा येतात. यामध्ये दलित कवयित्रींच्या कवितेमध्ये येणा-या सखी प्रतिमाचे विवेचन सदरील शोध निबंधामध्ये करण्यात आलेले आहे.

दलित स्त्रियांच्या शिक्षणामुळे त्यांच्या जीवनात परिवर्तन झाले. स्त्रियांमध्ये आत्मभान जागृत झाले. समस्त स्त्री वर्गाने भोगलेल्या यातना, दुःखाच्या जाणिवा त्यांनी 'सखी' प्रतिमेतून मांडल्या. परिवर्तनाची ही पाऊलखुण आपल्या सखीला पटवून देण्यासाठी सखी प्रतिमाचा वापर केलेला दिसतो. दलित कवितेतून व्यक्त होणारी स्त्री आपल्या सखीशी मुक्तपणे संवाद साधताना दिसते. दलित कवयित्री प्रतिभा अहिरे आपल्या सखीशी संवाद साधताना म्हणते की-

"प्रिय सखीस...
किती तुकड्या तुकड्यात तोडलय तुला मला
तुझ्या माझ्या समृद्ध संस्कारानी, प्रिय सखी...
आपापले चेहरे, सुद्धा शोधणं अवघड झालय हे
केव्हाच तोडलयं,
..... तुझ्या माझ्या वेदनाची जात कुठे निराळी का असते ?
तुझ्या स्मशान ओठावरल्या हिरव्या हस्यात,

मी ही अनाहुत पणे हसते
माझे सखे,
किती तुकड्या तुकड्यात तोडलयं तुला मला
तुझ्या माझ्या समृद्ध संस्कारानी”[2]

समाजव्यवस्थेने स्त्रीला आई, मुलगी, बहिन, पत्नी नात्यांच्या ओझाखाली दाबले आहे. ती स्त्री दलित आहे किंवा सवर्ण की हिंदू मुस्लिम समाजात दुर्लक्षित आहे. कवयित्री समग्र स्त्री जातीच्या वेदनाची जखम भळभळणारी असल्याचे चित्रित करताना म्हणते—

“सखे,
तुझी घुसमट, तुझं गुदमरण
या तथाकथित आपल्याला समाज, संस्कृती अन्
.... एकमेकांच्या डोळ्यातल्या स्वप्नाचे गर्भपात ओळखून का ?”[3]

प्रतिभा अहिरे येथे दोन स्त्री मनाचा संवाद करते. एक स्त्री मन सवर्ण आहे. तर दुसरे दलित. परंतु या दोघींचेही होणारी घुसमट सारखीच आहे. समाजात स्त्री मनाची होणारी कुचंबना आणि स्त्रीमुक्तीची ओढ ही दुहेरी घुसमट शब्दात टिपताना पुढे कवयित्री म्हणते—

“सखे,
तू कधीच एकटी नव्हतीस अन् नाहीयेस सखे
तुझ्या एका सनातन शोषित चेह-यामागे
किती तरी बिन चेह-याच्या सख्या बेघर झालेल्या असतात”[4]

स्त्रीत्वाच्या गुलामीचा नकार कवयित्रीने सखीच्या प्रतिमेतून टिपलेला आहे. स्त्रीच्या जगण्याच्या अधिकाराचा नकार येथे प्रकट होतो.

उषाकिरण आत्राम यांना क्रांतीचे महत्त्व पटलेले आहे. आपण आपल्या हक्कासाठी संघर्ष करायला हवा. हे अंतःकरणातून सांगताना त्या म्हणतात—

“... मी सा-या सख्यांना मोर्चात आणते
सगळ्यांच्या पदरात सूर्याचे वान देते”[5]

सर्व सख्यांना क्रांतीत उड्या घेण्यास सांगणा-या ही कवयित्री विद्रोही आहे. सखी व सूर्य या प्रतिमा कवितेतून येतात. ‘इमान’ कवितेमध्ये सखीला स्त्रीत्वाचे आत्मभान देताना दिसते. संकटाच्या वेळी खंबीर राहणा-या सखीला ती म्हणते—

“सखे, मी त्याही वेळी भारावून गेले होते
जेव्हा तू मला साथ द्यायचे कबूल केले होतेस
माझ्या भावनेला, माझ्या शब्दाला तू जपतेस
मी किती सुखावले होते
भ्रष्टाचाराने, स्वार्थाने बरबटलेल्या या देशात
आपले अस्तित्व टिकवताना तुच म्हणाली होतीस
आपण तत्वाने जगणारी माणसं आहोत म्हणून ?”[6]

संकटाच्या वेळी खंभीरपणे साथ देणारी, अस्तित्वहीन समाजात कर्तव्यनिष्ठा सांभाळणारी सखी कवयित्रीने येथे चित्रित केली आहे. देशाला विकवू पाहणा-या लोकांच्या विरोधात इमान सांभाळणारी ही क्रांतीकारी सखी आहे.

कुसुम आलम यांच्या 'काट्यांची फुले' कवितेमध्ये स्त्रीवेदना आपल्या सखीला सांगताना दिसते. अंधार पचवण्याची हिम्मत धरली तर तुला बिनधास्त जगता येईल. हे सांगताना कवयित्री म्हणते—

"ओठांवर लडीवाळ हसू ठेवून
निष्पाप मनाने चाललीस
पण सखे,
निष्ठुरांच्या वखवखलेल्या नजरा
तुझ्या शरीराची मापे घेत असतात
बिनधास्त चालावे"[7]

स्त्रीच्या वेदना कमी करायचे असतील तर तिच्या मध्ये स्वाभिमान असायला हवा. हे कवयित्री आपल्या सखीला येथे पटवून देते. तर सखेला तिच्या स्त्रीत्वाची ओळख करून देताना ती म्हणते—

"सखे लवकर ये मी इथे थांबली
चरणाची तू दासी नाही
ह्रदयाची हो राणी खरी"[8]

यापुढे जाऊन सखेला विद्रोही भूमिका घेण्यासाठी कवयित्री सूचविते. सखीला स्त्रीमधील सामर्थ्य आदर्श विसरल्याने ती गुलाम झाली आहे. पुरूषी व्यवस्था स्त्रियांना मागे खेचते. इतिहासामध्ये तेजोमय स्त्रिया होऊन गेल्या आहेत. त्यांचा आदर्श घेण्यास सांगताना कवयित्री लिहिते की—

"सखे,
तू का झुंगारावास तो तेजोमय इतिहास ?
सारा मानव समाज नव्या युगाच्या प्रतिक्षेत असताना
तु का झुकावेस स्वार्थाच्या
अज्ञान अंधश्रद्धेच्या अंधारापुढे ?"[9]

हिरा बनसोडे यांनी बालपणापासून कविता हिच माझी सखी असल्याचे म्हटले आहे. "माझ्या सुख-दुःखाची स्पंदने बनूनच ती ह्रदयात सतत वहात असते.... तीच्या माझ्यातलं नातं पाण्यातल्या माश्यासारखं....!"[10] त्यामुळे त्यांच्या कवितेतून येणारी सखी ही विद्रोही आहे.

"सखी,
आज प्रथमच तू माझ्याकडे जेवायला आलीस
नुसतीस आली नाहीस तर तुझी जात विसरून आलीस
सहसा बायका विषमतेच्या परंपरा विसरत नाहीत
सखी, तुझी परंपरा तु सोडली नाहीस
तर तिची घट्ट मुळे तुझ्या मनात रूजलेलीच आहे
हे त्रिवार सत्य आहे
म्हणून रागावू नकोस गं... !"[11]

हिरा बनसोडे यांच्या कवितेतील सखी ही जाती बंधने पायदळी तुडविणारी आहे. संस्कारी, बिनसंस्कारी स्त्री ही ताट वाढण्यावरून नसते दारिद्र्यात गहाण असणा-या दलित स्त्रियांना आतापर्यंत अन्न मिळाले नाही. आता कुठ पोटभर अन्न मिळत आहे. तेव्हा ते वाढण्यासाठी पदार्थाचा क्रम चुकला तर त्यात माझा काय दोष आहे. असे सवर्ण सखीला सांगते.

संध्या रंगारी यांनी सखी ऐवजी 'बयो' ही प्रतिमा सखीसाठी वापरली आहे. स्त्रीवेदनेची व्यथा, संसारात हरवून गेलेली बयो अस्तित्वहीन झाले असल्याचे वर्णन करताना कवयित्री म्हणते—

"बयो किती गं ही
जीवाची तगमग
संसार तर आहेच गं
अन् खाचखळगेही
पण थोडं थांब ना
अन् बघ जरा स्वतःकडं
तुझ्यामध्ये तु सापडतेस का जराशी"[12]

संध्या रंगारी यांनी येथे अस्तित्वहीन सखीच्या मनाचा वेध घेतला तर पुरूषी पर्यावरणात बंडखोरीचा पवित्रा घेताना खचलेल्या स्त्री मनाला धीर दिलेला आहे. स्त्रीमुक्तीच्या प्रबळ उर्मितून ती सखीला म्हणते—

"उठ सखे नको गं खचू अशी
प्रसवू आपण उजेडाच्या राशी
भिंती-भिंतीत चिणलेत त्यांनी आपले श्वास
श्वासांना आता स्वातंत्र्याची आस"[13]

नात्यांच्या ओझ्याखाली गुदमरून गेलेल्या श्वासाला झटकून टाकून स्वातंत्र्याची आस धरण्याची इच्छा सखी प्रतिमेतून अभिव्यक्त होते.

निष्कर्षतः असे म्हणता येते की, दलित कवयित्रींच्या कवितेत येणारी 'सखी' प्रतिमा ही स्त्रीच्या अंगाने येणारी आहे. ही सखी कोणत्याही जाती, धर्माची नसून ती फक्त उपेक्षित स्त्री आहे. स्त्रियांच्या दुःख, व्यथा, वेदना या सखी प्रतिमेतून अभिव्यक्त होतात.

**संदर्भ :**


1. साहित्याची भाषा, भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद,दु.आ. 1998, पृ.सं. 197.
2. मला हवी असणारी पहाट, प्रतिभा अहिरे, साद प्रकाशन, औरंगाबाद, दु.आ. 2009, पृ.सं. 13.
3. तत्रैव, पृ.सं.58.
4. तत्रैव, पृ.सं. 20.
5. म्होरकी, उषाकिरण आत्राम, गोंडवाना गौंडी साहित्य परिषद,नागपुर, 1997, पृ.सं. 47
6. रान आसवांचे तळे, कुसुम अलाम, सौ.कुसुम अलाम अलापल्ली, जि. गडचिरोली, प्र.आ. 1998, पृ.सं. 66.
7. तत्रैव, पृ.सं. 83.
8. तत्रैव, पृ.सं.
9. तत्रैव, पृ.सं. 90.
10. फिर्याद, हिरा बनसोडे, मनोगत, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, दु.आ. 1997, पृ.सं. 08.
11. तत्रैव, पृ.सं. 39-40.
12. संध्यारंग, संध्या रंगारी, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे, प्र.आ. 2010, पृ.सं. पृ.सं. 34.
13. कवडसे, संध्या रंगारी, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. 2003, पृ.सं. 43.